MAHAMUL03014/13/1/2012-TC
Special Issue No. 1, March 2018

ISSN : Online : 2320-8341
Print : 2320-6446

# RESEARCH FRONT

An International Multidisciplinary Research Journal



# Social and Economic Justice-
# Past, Present and Future

**Prin. Dr. C. J. Khilare**
Chairman

**Mr. S. M. Mahajan**
Editor

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341


| | | |
|---|---|---|
| 23 | Pre-Primary Education And Justice For Anganwadi Workers **Prof. Mrs. Shamala R. Mane** | 110-113 |
| 24 | Effect of Family Type And Gender on Emotional Maturity Among Undergraduate Students **Prof. Pramila A. Surve, Prof. Ramesh S. Kattimani** | 114-118 |
| 25 | Consumer And Consumer Protection Act ,1986 : Issues And Challenges **Smt. Sampada S. Lavekar** | 119-123 |
| 26 | Gender Inequality In India **Prof. Shobha Sambhoji** | 124-125 |
| 27 | हिंदी साहित्य में अभिव्यक्ति स्वातंत्र्य **श्री काकासाहेब बापूसाहेब भोसले** | 126-127 |
| 28 | कन्हैयालाल माणिकलाल मुंशी के 'युधिष्ठिर' उपन्यास में प्रतिबिंबित धार्मिक एवं न्यायिक यथार्थता **देवकाते भागवत भगवान** | 128-131 |
| 29 | चित्रा मुद्गल के 'प्रतिनिधि कहानियों' में ग्राम्य और शहरी जीवन के विषमता का यथार्थ दर्शन **कांबळे श्रावण आबा** | 132-134 |
| 30 | नागार्जुन के काव्य में युगीन विषमता और सामाजिक आस्था एवं विश्वास के स्वर **लेफ्टनंट डॉ.रविंद्र पाटील** | 135-137 |
| 31 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर याची सामाजिक विकासाची मीमांसा **प्रा. डॉ. वासुदेव डोंगरदिवे** | 138-146 |
| 32 | महिला आरक्षणाचे राजकारण आणि स्त्रियांचा राजकीय सहभाग-समतेच्या संदर्भात **प्रा. सौ. सुपेकर व्ही. पी.** | 147-150 |
| 33 | 'मूलभूत हक्क आणि सामाजिक न्याय' **प्रा. सुहास निर्मले** | 151-153 |
| 34 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पुणे करार : एक चिकित्सक अभ्यास **डॉ. विनोद संभाजी सोनवणे** | 154-157 |
| 35 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान : 'स्त्री' च्या सामाजिक न्यायासाठी **डॉ. श्रीमती सिंधू जयवंत आवळे** | 158-160 |
| 36 | 'राजा राममोहन रॉय यांनी सतेप्रथेविरूध्द मिळविलेला न्याय' **प्रा. डॉ. संतोष तुकाराम कदम** | 161-164 |
| 37 | महिलांना समान न्याय व पंचायत राज्यातील त्यांचे योगदान **प्रा. भाऊसाहेब खंडू सांगळे** | 165-167 |
| 38 | पंचायतराज व्यवस्थेमधून महिला सबलीकरण : एक सामाजिक न्याय प्रक्रिया **प्रा. सचिन शंकर ओवाळ** | 168-170 |
| 39 | भारतातील लिंग आधारित भेदभाव आणि न्याय **प्रा. रावसहेब सटवा कांबळे** | 171-175 |
| 40 | हिंदू स्त्रियांचे वैवाहिक हक्क आणि न्याय" **प्रा. रजनी कारदगे** | 176-178 |
| 41 | मानवी हक्क आणि शिक्षण **प्रा. अडसरे व्ही. बी.** | 179-181 |
| 42 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक न्याया बाबतचे विचार **प्रा. नदाफ बी. आर.** | 182-183 |
| 43 | आर्थिक कल्याण : सामाजिक न्यायाचा आधार **कुबेर दिनकर दिंडे** | 184-187 |
| 44 | विचारेमाळ झोपडपट्टीतील बालकामगार आणि सामाजिक न्याय **प्रा. कन्नाडे ममता कार्तिक** | 188-191 |
| 45 | शिवकालीन न्यायव्यवस्था **प्रा. डॉ. चंद्रकांत गिरी** | 192-195 |
| 46 | शिक्षणाचा अधिकार **प्रा. डॉ. गावडे एस. एम.** | 196-201 |
| 47 | अहमदनगर जिल्हयातील कम्युनिस्ट पक्षाचे जायकवाडी धरणग्रस्तांच्या लढयातील योगदान **प्रा. विधाटे गणेश शंकर** | 202-208 |
| 48 | पांगिरे प्रकरण (काशीबाई हणबर) **प्रा. डॉ. कोळसेकर मनोहर सुबराव** | 209-210 |
| 49 | शिक्षणाचा मुलभूत अधिकार आणि बालक हक्क धोरण **श्री अजितकुमार भिमराव पाटील** | 211-220 |
| 50 | स्त्रीः "धर्म आणि न्याय" **प्रा. डॉ. नंदिनी रविंद्र रणखांबे** | 221-223 |
| 51 | सामाजिक सुधारणा चळवळीचे अग्रदूत जगन्नाथ शंकरशेट **प्रा. उमेश गणेशराव जांभोरे** | 224-227 |
| 52 | जागतिकीकरण व न्यायः काही निरीक्षणे **प्रा. टी. वाय.रणदिवे** | 228-230 |

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# शिक्षणाचा अधिकार

**प्रा.डॉ.गावडे एस.एम.**
चंद्राबाई–शांताप्पा शेंडूरे कॉलेज,हुपरी.

गोषवारा

*संयुक्त राष्ट्रसंघाच्या जाहिरनाम्याच्या प्रस्तावनेमध्ये मानवाच्या हक्काचे महत्त्व सांगत असताना असे म्हंटले आहे की, 'सर्व मानावाना समान हक्क मिळणे आणि त्यांच्या प्रतिष्ठेचे रक्षण होणे हा जगातील स्वातंत्र्य, न्याय व शांतता यांचा पाया आहे'. जसे प्रत्येक व्यक्तीला जीवन जगण्याचा, स्वातंत्र्याचा व व्यक्तिगत सुरक्षिततेचा हक्क आहे तसेच प्रत्येक व्यक्तिला शिक्षणाचाही अधिकार असून त्याला किमान प्राथमिक पायाभूत स्तरांपर्यंत तरी मोफत शिक्षण मिळाले पाहिजे, हे शिक्षण सर्वांना सक्तीचे असले पाहिजे. तसेच हे दिले जाणारे शिक्षण मानवाच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाला आणि मानवी हक्क व मुलभूत स्वातंत्र्य याविषयी त्या व्यक्तिच्या मनात आदर वाढीस लावण्यास पूरक असले पाहिजे. असे हे शिक्षण राज्यातील प्रत्येक व्यक्तिपर्यंत पोहचविण्यासाठी महाराष्ट्र शासन राज्याच्या स्थापनेपासून प्रत्येक वाडी वस्तीपर्यंत शैक्षणिक सुविधा देणे, शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगण्यासाठी विविध माध्यमांच्याद्वारे प्रबोधन करणे असे कार्य करित आहे. पण तरीसुद्धा अजूनही राज्यातील कितीतरी मुले शिक्षणापासून वंचित आहेत किंवा कांही जणांचे शिक्षण मध्येच खंडीत होते. यामागे काय कारण आहे याचा शासनस्तरावर आढावा घेऊन शासन त्यांच्यासाठी काय प्रयत्न करित आहे, तसेच राज्यातील विविध सेवाभावी संस्थाच्या माध्यमातून राज्याची शैक्षणिक प्रगती होण्यासाठी कोणकोणते उपक्रम राबविले जातात. याबाबत सदर शोधनिबंधात थोडक्यात अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.*

## प्रस्तावना

विसाव्या शतकापासून मानवी हक्कांचा किंवा मानवाधिकारांचा जोरदार पुरस्कार करण्यात येऊ लागला आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेपासून 'मानवी हक्क' या बाबीला महत्त्व आले. मानवी हक्क हे मानवाच्या जीवनाचे अविभाज्य भाग आहेत. मानवी हक्कांशिवाय कोणत्याही व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करून घेणे शक्य नाही. तसेच हे हक्कच मानवाला चांगल्या प्रकारचे जीवन जगण्यास मदत करतात असे मानवी हक्कांच्या समर्थकांना वाटते.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने 10 डिसेंबर 1948 रोजी 'मानवी हक्कांचा सार्वत्रिक जाहिरनामा समंत व स्वीकृत केला.' या जाहिरनाम्याच्या प्रस्तावनेमध्ये मानवी हक्कांबाबत असे म्हटले आहे की, सर्व मानवाना समान हक्क मिळणे आणि त्यांच्या प्रतिष्ठेचे रक्षण होणे हा जगातील स्वातंत्र्य, न्याय व शांतता यांचा पाया आहे. मानवी हक्कांचे उल्लंघन व त्यांचा अनादर यामधून निर्माण होणारी रानटी कृत्ये हा मानवजातीच्या सद्सद्विवेकबुद्धीवर झालेला आघात आहे.

## मानवी हक्कांचे मापदंड :

संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्कांच्या जाहिरनाम्यामध्ये मानावांच्या हक्काचे मापदंड खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

सर्व मानव प्रतिष्ठा व हक्क याबाबतीत जन्मतः स्वतंत्र व समान आहे. प्रत्येक व्यक्तीला जीवन जगण्याचा, स्वातंत्र्याचा आणि व्यक्तिगत सुरक्षिततेचा हक्क आहे. प्रत्येक व्यक्ती कायद्यापुढे समान आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता कायद्याचे समान संरक्षण मिळण्यास पात्र आहे. गंभीर गुन्ह्याचा आरोप असलेल्या प्रत्येकाला, जोपर्यंत त्याला कायद्यानुसार दोषी ठरविले जात नाहीत तोपर्यंत स्वतःच्या निर्दोषत्वाचा दावा करण्याचा हक्क आहे. व खटल्यात स्वतःचा बचाव करण्याचा हक्क आहे. प्रत्येकाला त्याच्या राज्यामध्ये कोठेही संचार करण्याचा हक्क आहे, प्रत्येकास दुसऱ्या देशाकडे आश्रय मागण्याचा हक्क आहे. याशिवाय प्रत्येकाला मत व अभिव्यक्ती, सामाजिक सुरक्षितता, राज्यकारभारात सहभागी होण्याचा हक्क आहे. असे अनेक हक्क किंवा अधिकार व्यक्तीला देण्यात आले आहे. त्यापैकी प्रत्येकी व्यक्तीला शिक्षणाचा अधिकार असून त्याला किमान प्राथमिक शिक्षण किंवा पायाभूत स्तरापर्यंत तरी मोफत शिक्षण मिळाले पाहिजे. तसेच हे शिक्षण सर्वांना सक्तीचे असले पाहिजे. शिवाय हे दिले जाणारे शिक्षण मानवाच्याा व्यक्तिमत्त्वाच्या विकासाला आणि मानवी हक्क व मूलभुत स्वातंत्र्य याविषयी त्या व्यक्तीच्या मनात आदर वाढीस लावण्यास पूरक असले पाहिजे. असे नमूद केले आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

संयुक्त राष्ट्रसंघाने व भारतीय घटनेने मानवाला किंवा व्यक्तीला शिक्षणाचा जो मुलभूत अधिकार दिलेला आहे. ते शिक्षण संबंधित घटकापर्यंत पोहचवून त्यांचा गुणात्मक विकास करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने व विविध सेवाभावी संस्थानी कोणकोणते प्रयत्न केले आहेत. याचा थोडक्यात अभ्यास करण्याचा येथे प्रयत्न करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

प्रस्तुत शोध निबंधाच्या अभ्यासाची उद्दिष्टये खालीलप्रमाणे.

1. शिक्षण संकल्पना समजून घेणे.
2. शिक्षण समाजातील वंचित घटकापर्यंत पोहचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.
3. गुणवत्तापूर्ण शिक्षण राज्यातील प्रत्येक घटकापर्यंत पोहचविण्यासाठी इतर सेवाभावी संस्था करीत असलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

**गृहितक :**

शिक्षण वंचित घटकापर्यंत पोहचविण्यामध्ये शासनाला अद्यापी अपेक्षित यश मिळाले नसल्याचे आढळून आले.

**अभ्यास पद्धती :**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम स्त्रोतांचा अवलंब केला असून यामध्ये संदर्भग्रंथ, वृत्तपत्र व वेबसाईटचा वापर करून माहिती संकलित केली आहे.

**शिक्षण म्हणजे काय ?**

व्यवहारात शिक्षण म्हणजे शाळेत जाणे, ज्ञान मिळविणे, परीक्षा देणे व पदवी प्राप्त करणे असा संकुचित अर्थ घेतला जातो. पण शिक्षण या शब्दांचा किंवा संकल्पनेचा खुप व्यापक अर्थ असल्याचे दिसून येते. काळानुसार व विचारवंतांच्या व्याख्येवरून शिक्षण या संकल्पनेचा अर्थ कसा बदलत गेला आहे ते आपण पाहू.

**प्राचीन भारतात :**

शिक्षणाला दुसरा पर्यायी शब्द आहे विद्या.

1. मानवाला जी स्वावलंबी व निःस्वार्थी बनविते तीच विद्या होय. – **ऋग्वेद**
2. तीच विद्या खरी जी मानवाला मोक्ष मिळवून देते. – **उपनिषद्**
3. आत्मसाक्षात्कार आणि जनसेवा हेच खरे शिक्षण – **गुरूनानक**

**अर्वाचीन भारतात :**

प्राचीन भारतीय विचारवंताप्रमाणे या काळातील भारतीय विचारवंतांची शिक्षणाबद्दलची कल्पना.

1. मानवातील उपजत दैवी गुणांची अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण – **स्वामी विवेकानंद**
2. मानवाच्या शारीरिक, मानसिक व अध्यात्मिक अंगामधील उत्कृष्टतेचा विकास व अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण होय. – **महात्मा गांधी**
3. शिक्षण म्हणजे आत्मविष्कार – **रविंद्रनाथ टागोर**

वरील व्याख्यावरून असे लक्षात येते की, मानवातील सुप्त दैवी गुणांना विकासाची संधी उपलब्ध करून देणे, त्यांना स्वावलंबी बनवून त्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकसित करणे म्हणजेच शिक्षण होय. असा शिक्षणाचा अर्थ भारतीय विचारवतांना अभिप्रेत आहे.

**पाश्चात्य विचारवतांची मते :**

1. मानवाचे शरिर व आत्मा यांच्यातील उत्कृष्टतेचा पूर्णत्वाप्रत विकास म्हणजे शिक्षण होय. – **प्लेटो.**
2. निरोगी शरिरात निरोगी मनाचा विकास करणे म्हणजे शिक्षण होय. – **ॲरिस्टॉटल**
3. संपूर्ण जीवनाची तयारी म्हणजे शिक्षण – **हरबर्ट स्पेन्सर**
4. शिक्षण म्हणजे सवय. कोणत्याही कृत्रिम सवयीच्या आहारी न जाणे. निसर्गानुसार वागणे. – **रूसो.**

वरील विविध व्याख्यांवरून सर्वमान्य होईल अशी व्याख्या **रेडन** यांनी केली.

'परिपक्व व्यक्तीने अपरिपक्व व्यक्तीच्या वैयक्तिक तसेच सामाजिक गरजा लक्षात घेऊन सूचना व शिस्तीच्या द्वारे व्यक्तीतील शारिरिक, मानसिक, बौद्धिक, सौंदर्यात्मक सामाजिक तसेच अध्यात्मिक शक्तींचा सुसंवादात्मक विकास साधून मोक्षप्राप्ती करण्यासाठी नियोजित केलेली पद्धतीशीर योजना म्हणजे शिक्षण होय.'

या वरील व्याख्येवरून शिक्षणाचे स्वरूप स्पष्ट होण्यास मदत होते.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**2. राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती :**

इयत्ता 10 वी च्या परीक्षेत अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्याने 75 टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळवून 11 वी व 12 वी मध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांना याचा लाभ होतो. 11 वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्याला व 12 वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यालाही दरमहा रू. 300 व 10 महिन्यांचे एकूण रू. 3000 शिष्यवृत्ती मिळते.

**3. राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार :**

इयत्ता 10 वी व 12 वीच्या परिक्षेत सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून प्रथम आलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना याचा लाभ होतो.

<u>लाभाचे स्वरूप :</u> -

- राज्यात प्रथम – रू. 2.50 लाख रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र
- बोर्डात प्रथम – रू. 1.00 लाख रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र
- गुणवत्ता यादीत – रू. 50 हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र
- जिल्ह्यात प्रथम – रू. 25 हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र
- तालुक्यात प्रथम – रू. 10 हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र
- शाळेत प्रथम – रू. 5 हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र

**4. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिक्षण फी व परीक्षा फी प्रदान :**

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणेसाठी त्याची मॅट्रीक नंतर शिक्षण घेत असलेल्या वर्गाची सर्व शिक्षण फी व परीक्षा फी संबंधित शिक्षण संस्थेला शासनामार्फत दिली जाते.

**5. भारत सरकारची शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना :**

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देवून त्यांच्या गळतीचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने ही योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना त्याची शिक्षण फी, परीक्षा फी व विद्यापीठ/महाविद्यालयांना मान्य केलेल्या इतर सर्व फीची रक्कम संबंधीत महाविद्यालयात जमा केली जाते. तसेच विद्यार्थ्यांना दरमहा निर्वाहभत्ता ही दिला जातो.

**6. परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती :**

अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये उच्च शिक्षणाची संधी या योजनेअंतर्गत उपलब्ध करून दिली जाते.

**7. शासकिय वसतिगृहे :**

मागासवर्गीय मुलामुलींची सोय व्हावी तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण घेता यावे यासाठी शासकिय वसतिगृहे शासनामार्फत उघडण्यात आली.

**8. अनुसूचित जातीच्या मुलां–मुलींसाठी आश्रमशाळा :**

राज्यातील अनुसूचित जातीमधील लोकांचे आर्थिक जीवन खूप हलाकीचे व काही लोक मोलमजूरीसाठी सतत भटकंती करतात अशा लोकांच्या मुलांचे शिक्षण खंडीत होते. म्हणून त्या मुलांसाठी ज्या जिल्ह्यात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे, अशा जिल्ह्यात स्वंयसेवी संस्थेमार्फत आश्रमशाळा सन 1995–96 पासून सुरू करण्यात आल्या.

**9. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना विद्यावेतन :**

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण देऊन त्यांना विविध क्षेत्रात व्यावसायिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी ही योजना लागू केली.

**10. पुस्तकपेढी योजना :**

वैद्यकिय, अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, कृषी व पशुवैद्यकिय महाविद्यालयातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना पुस्तकांचे संच या योजनेअंतर्गत उपलब्ध करून दिले जातात.

**11. सैनिक शाळेतील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता :**

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सैनिक शाळेत प्रवेश मिळावा, सैन्यदलात भरती होण्याचे त्यांना आकर्षण निर्माण व्हावे, त्यांच्यामध्ये देशभक्ती रूजावी या उद्देशाने ही योजना लागू केली.

ISSN (Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**12. सफाई कामगारांच्या मुला–मुलींसाठी निवासी शाळा :**

अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत. त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून ही योजना सुरू केली.

वरील व या शिवाय अनेक योजना अनुसूचित जातीतील मुलांना शिक्षणामध्ये प्रोत्साहन मिळावे यासाठी सुरू करण्यात आल्या.

**क) विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील मुलां–मुलींच्या शिक्षणासाठी योजना :**

**1. सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती :**

विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील 5 वी ते 7 वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या कोणत्याही आर्थिक वर्गातील मुलींना प्रतिमहा रू. 60 प्रमाणे 10 महिन्यांसाठी रू. 600 शिष्यवृत्ती देण्यात येते. तर 8 वी ते 10 वी मध्ये शिकणाऱ्या मुलींसाठी प्रतिमहा रू. 100 प्रमाणे 10 महिन्यांसाठी एकूण रू. 1000 शिष्यवृत्ती देण्यात येते.

**2. माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती :**

विजाभज व विमाप्र प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ व्हावी म्हणून ही शिष्यवृत्ती दिली जाते. जो विद्यार्थी मान्यताप्राप्त संस्थेत शिक्षण घेत आहेत. व ज्यांना वार्षिक परिक्षेत 50 टक्के पेक्षा जास्त गुण मिळून ते वर्गात प्रथम किंवा द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत. अशा विद्यार्थ्यांना इयत्ता 5 वी ते 7 वी प्रतिमहा रू. 20 प्रमाणे 10 महिन्यांसाठी रू. 200 तर 8 वी ते 10 वी मध्ये शिकणाऱ्या मुलींसाठी प्रतिमहा रू. 40 प्रमाणे 10 महिन्यांसाठी एकूण रू. 400 इतकी रक्कम शिष्यवृत्ती म्हणून दिली जाते.

**3. शिक्षणशुल्क व परीक्षा शुल्क मध्ये सवलत :**

मॅट्रीकेत्तर शिक्षण घेणाऱ्या व जे शासनाच्या उत्पन्नाच्या मर्यादेच्या अटीत बसतात अशा विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शासकिय दराने शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क देण्यात येते.

वरील योजनांबरोबरच जे विद्यार्थी 10 वी च्या वर्गात 75 टक्के पेक्षा जास्त गुण मिळवून 11 वी 12 वी मध्ये शिकत असतात त्यांनाही शासनाकडून शिष्यवृत्ती मिळते. स्वंयसेवी संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या (विजाभज/विमाप्र) मुलां–मुलींसाठी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक निवासी आश्रमशाळांना सहाय्यक अनुदान दिले जाते तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थातील प्रशिक्षणार्थींना विद्यावेतन दिले जाते.

वरीलप्रमाणे शासनस्तरावर शाळेतील विद्यार्थी गळती थांबवून वर्गातील पटसंख्या वाढविण्याचा व शैक्षणिक प्रगती साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्याचप्रमाणे समाजातील काही अनुभव, प्रतिभासंपन्न लोकांनी विविध संस्थाची स्थापना करून त्यामार्फत प्रयोगशील शैक्षणिक उपक्रम राबवून मुलांच्यामध्ये शिक्षणाबाबत गोडी निर्माण करण्यात व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करण्यामध्ये काही प्रमाणात का असेना यश मिळविल्याचे दिसून येते. म्हणूनच महाराष्ट्रातील अशा प्रयोगशील शैक्षणिक उपक्रम राबविणाऱ्या संस्थांचा आपण थोडक्यात आढावा घेऊ.

**महाराष्ट्रातील प्रयोगशील शैक्षणिक उपक्रम :**

**1. सृजन आनंद शिक्षण :**

इ.स. 1985 मध्ये कोल्हापूर मध्ये 'सृजन आनंद' विद्यालयाची स्थापना प्राचार्या लिलाताई पाटील यांनी केली. या शाळेत शिकलेले विद्यार्थी आज विविध क्षेत्रात कार्यरत असून त्यांच्या मते, सृजन आनंद ही केवळ शाळा नाही तर ती एक गंमत आहे. संवेदनक्षमता, प्रतिकारक्षमता आणि जगाच वेगळं आकलन करून देणारी शाळा म्हणजे सृजन आनंद विद्यालय. येथील शिक्षक केवळ शिक्षक नसतात. तर ते त्यांचे ताई–दादा असतात. येथे शिस्तीचे धडेही मिळतात. जबाबदारीची जाणीवही होते व मुक्त जीवनही जगायला मिळते.

**2. अक्षरनंदन :**

स्वातंत्र्य, समता व बंधुभाव याबरोबरच सर्वधर्म समभाव, सहिष्णुता लोकशाही या संकल्पना नसून त्या आपल्या विचारसरणीचा व जीवनशैलीचा एक भाग आहेत. अशी शिकवण देणारी, शिक्षणक्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण आणि वेगळे प्रयोग करणारी संस्था म्हणजे 'अक्षरनंदन' संस्था होय. किमान अध्ययनक्षमता विकसित करतानाच विचार करण्याची, स्वतःची मते निर्माण करण्याची, निरीक्षणातून अध्ययन करण्याची आणि आत्मविश्वासाने आपल्या सुप्त गुणांचा विकास

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

करण्यास प्रोत्साहन देण्याचे कार्य या संस्थेमार्फत केले जाते. वर्षा सहस्त्रबुद्धे, विद्या पटवर्धन, गौरी देशमुख वैगरेंनी अतिशय प्रयत्नातून या संस्थेचा वेगळा ठसा शिक्षणक्षेत्रात उमटवला आहे.

**4. ग्राममंगल संस्था :**

प्रा.रमेश पानसे या कृतिशील शिक्षणतज्ञाने ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भागात 1982 साली 'ग्राममंगल' या प्रयोगशील शिक्षणसंस्थेची स्थापना केली. नोकरी सोडून अनुताई वाघ यांच्या बरोबर कोसबाडला त्यांनी कार्य केले. बालशिक्षण, प्राथमिक शिक्षण यामागील नवे शास्त्र विचारात घेऊन मुल कसे असते, कसे वाढते व कसे शिकते? याबाबत शास्त्रीय आकलन विचारात घेऊन शिक्षणात प्रयोग केले.

**5. गरवारे बालभवन :**

गरवारे ट्रस्ट आणि पुणे महानगरपालिका यांनी संयुक्तपणे 1 सप्टेंबर 1985 रोजी 'बालभवन' प्रकल्पाची सुरूवात केली. या प्रकल्पाची संचालिका शोभा भागवत असून त्यांनी कल्पकता, सृर्जनक्षमता आणि आनंददायी अनुभवातून विद्यार्थ्यांसाठी नाविण्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत. आतापर्यंत हांजारो मुलांनी विविध शैक्षणिक, क्रीडा आणि जीवनकौशल्य विकसित करणारे आनंददायी अनुभव घेतले. मेळावे, सण, उत्सव, बालदिन, शिबीरे असे अनेक कार्यक्रम या संस्थेमार्फत राबविले जातात.

**6. 'आपणच' :**

दि. 13 सप्टेंबर 1999 रोजी 'आपणच' या संस्थेची स्थापना झाली. शिक्षणातील विविध समस्या सोडविणे व त्याद्वारे शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे हे प्रमुख ध्येय, केवळ परिणामापेक्षा दृष्टीकोन बदलावर भर देणे, सदस्यांमध्ये जवळीक, आपुलकी अनौपचारिक नाते निर्माण करणे वैगरे उद्दिष्ट.

वरील संस्थाच्या बरोबरच महाराष्ट्रात शैक्षणिक कार्याला उत्तेजन देणाऱ्या व विविध प्रयोगाद्वारे महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासास हातभार लावणाऱ्या संशोधन प्रकल्प, वनस्थळी, ग्रामीण विकास केंद्र, अमन, सेतू वैगरे संस्था कार्यरत आहेत.

**समारोप :**

शिक्षण हे समाजीकरणाचे प्रमुख साधन आहे. व्यक्तीच्या समाजीकरणाची सुरूवात जरी कुटूंबापासून होत असली तरी कुटूंबसंस्थेच्या कार्याला काही मर्यादाही पडतात. मुलांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्यात कुटूंबाला अपेक्षित यश येत नाही. मुलांना सामाजिक मुल्ये, नित्तीमत्ता, प्रामाणिकपणा, सामाजिक जाणीव, खिलाडूवृत्ती इ. गोष्टींची माहिती देवून त्यांचे महत्त्व मुलांच्या मनावर बिंबविण्याचे कार्य शिक्षणसंस्थेमधूनच चांगल्या प्रकारे केले जाऊ शकते. व्यक्तीच्या अंगभूत गुणांना चालना देणे, तिला ज्ञानसंपन्न बनविणे. तिचे अनुभवविश्व समृद्ध करणे इ. गोष्टी शिक्षणा द्वारे केल्या जाऊ शकतात. एकूणच मानवी जीवनामध्ये असणारे शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेता चांगले, दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे हा मानवाचा मूलभुत अधिकार असून ते देणे हे शासनाचे कर्तव्य आहे.

**संदर्भग्रंथ :**

1. पाटील व्ही.बी., मानवी हक्क, के सागर पब्लिकेशन्स, पुणे 2009.
2. घोडके अमोल लक्ष्मण, भारतातील मानव संसाधन विकास, द युनिक ॲकॅडमी, पुणे 2013.
3. अहेर हिरा, उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक, विद्या प्रकाशन, नागपूर 1995.
4. प्रभुणे रा.गो. (संपादक), शिक्षण प्रबोधन, शिक्षण मंडळ, कराड 2010.
5. डिसूझा अल्बर्ट रेमेत (संपादक) शिक्षण विचार, शिक्षण मंडळ, कराड 2007.
6. तांबोळी शमशुद्दीन, महाराष्ट्राचा शैक्षणिक विकास, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे 2009.
7. शर्मा कृष्णकुमार, मानवाधिकार विश्वकोश, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली 2011.
8. शर्मा कृष्णकुमार, मानवाधिकार एवं शिक्षा, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली 2012.